क्र./भूमापन-३ / विनोंक्र. २७३/१७/२०१९
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि
अभिलेख (म. राज्य) पुणे यांचे कार्यालय
पुणे, दिनांक १९/०८/२०१९

प्रति,
जिल्हाधिकारी, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद, परभणी, उस्मानाबाद, हिंगोली, जालना, नांदेड, लातूर, बीड, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर.

**विषय** :- पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र जमीन धारकाने लागवडीखाली आणल्यास त्यास लागवडी खालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहीत करुन त्या अनुषंगाने क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्रधिकारी यांना दिशानिर्देश देण्याबाबत.

**संदर्भ** :- १. महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण-२०१८/ प्र.क्र. ३६/ ज- १अ, दि. ८/८/२०१९
२.या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./भूमापन-३ / विनोंक्र. २७३/१७/२०१९, दि. १९/८/२०१९

विषयांकित बाबत संदर्भीय पत्रान्वये पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र जमीन धारकाने लागवडीखाली आणल्यास त्यास लागवडी खालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दतीचे परिपत्रकास शासनाकडून सहमती व मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील संदर्भ क्र. २ अन्वये सदर परिपत्रक निर्गमित करणेत आले आहे. ते यासोबत पाठविणेत आले आहे. तरी सदर परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सोबत पानांक १ ते १८ आहेत.

स्थळ प्रतीवर मा. जमाबंदी आयुक्त, पुणे
यांची स्वाक्षरी असे.

१९/८/२०१९

( सतिश भोसले )
उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न
जमाबंदी आयुक्त (भूमापन) पुणे

19 AUG 2019
DISPATCHED
No. २७४८८ ते २७५२३